# पुणे महानगरपालिका, पुणे

उप आयुक्त (अतिक्रमण/अनाधिकृत बांधकाम निर्मुलन विभाग)

---

विषय : पुणे शहरातील सार्वजनिक उत्सवांचेवेळी महानगरपालिकेच्या रस्ता, पदपथांवर उभारण्यात येणाऱ्या मंडप/स्टेज करिता मा. उध न्यायालयाने सार्वजनिक उत्सव करताना ठरवून दिलेल्या मार्गदर्शक निर्देशानुसार पुणे महानगरपालिकेकडून परवानगी देण्याची कार्यवाही करताना अवलंबविण्यात येणारी कार्यपद्धती.

---

# पुणे महानगरपालिका-मंडप धोरण-२०१५

(पुणे महानगरपालिका मा. मुख्य सभा ठराव क्र.३२१,दि.१८/९/२०१५ अन्वये मान्यता.)

सदर ठरावान्वये दिलेल्या मान्य उप सूचनेनुसार दुरुस्त केलेली प्रत

---

# प्रस्तावना

पुणे महानगरपालिका क्षेत्रामध्ये दरवर्षी विविध सर्वधर्मीय सार्वजनिक सण/उत्सव उदा. गणपती/नवरात्रौ उत्सव, दहिहंडी उत्सव, रमजान ईद, नाताळ इत्यादी तसेच सर्व राष्ट्रपुरुषांच्या जयंत्या साजऱ्या करताना संबंधित सार्वजनिक मंडळे, संस्था/संघटना, नागरिक यांचेकडून पुणे महानगरपालिकेच्या सार्वजनिक रस्ता, पदपथांवर मंडप/स्टेज उभारण्यात येतात. याकरिता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २३४ अन्वये पुणे महानगरपालिकेकडून अधिकृत परवानगी देणेकरिता मा. मुख्य सभेने वेळोवेळी मान्य केलेल्या प्रचलित मान्य दरांनुसार आकारणी करुन परवानगी देण्याचे काम मनपाच्या उप आयुक्त (अतिक्रमण/अनाधिकृत बांधकाम निर्मुलन विभाग) या कार्यालयाचे नियंत्रणाखाली सर्व क्षेत्रिय कार्यालयांकडून करण्यात येत होते.

परंतु सार्वजनिक समारंभाच्या व उत्सवांच्या प्रसंगी रस्ता/पदपथांवर उभारण्यात येत असलेल्या मंडपा संदर्भांत मा. उध न्यायालयात दाखल केलेल्या जनहित याचिका क्रमांक १७३/२०१२ सोबत सिव्हील ॲप्लिकेशन क्रमांक १२४/२०१४ मध्ये मा. उध न्यायालयाने दि.१३ मार्च २०१५ व दि.१४ जून २०१५ रोजी महानगरपालिकांच्या आयुक्तांना मुंबई अधिनियम १८८८ च्या कलम ३१७ व महाराष्ट्र महापालिका अधिनियम कलम २३४ अन्वये असलेल्या अधिकारासंदर्भांत सविस्तर विवेचन करुन त्यानुसार कार्यवाही करणेकरिता शासनास निर्देश दिले. त्याअनुषंगाने महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, शासन परिपत्रक क्रमांक याचिका २०१५/सं.क्र.८७८(१)/नवि ३४, मंत्रालय, मुंबई-३२ यांचे दि.६ जुलै २०१५ रोजीचे कार्यालयीन परिपत्रकान्वये पुणे महानगरपालिकेस वरिल प्रकरणी मा. उध न्यायालयाने दिलेल्या निर्देशानुसार नव्याने सर्वकष मंडप उभारणी करिताचे धोरण तयार करुन त्याची अंमलबजावणी करणेस आदेश प्राप्त झाले.

त्याअनुषंगाने मा. उध न्यायालयाकडून दिलेल्या मार्गदर्शक तत्त्वांचा अवलंब करुन पुणे महानगरपालिकेकडून सार्वजनिक सण, उत्सव शांततेत व सुरळीत पार पाडणेकरिता या उत्सवांचे कालावधीत सार्वजनिक रस्ता/पदपथांवर उभारण्यात येणाऱ्या मंडप/स्टेज/कमान/रनिंग मांडव इत्यादींना परवानगी देणेकामी नव्याने पुणे महानगरपालिका-मंडप धोरण-२०१५ हे मा. मुख्य सभा ठराव क्र.३२१, दि.१८/९/२०१५ अन्वये मान्य करण्यात आले. त्यास मा. महापालिका आयुक्त ठराव क्र.६/६२, दि.२०/५/२०१६ अन्वये अंमलबजावणीस प्रशासकीय मान्यता घेण्यात आलेली आहे. सदर धोरणामधील नियम व अटी/शर्तीनुसार पुणे शहरातील सार्वजनिक सण/उत्सवांचे कालावधीत महानगरपालिकेच्या रस्ता/पदपथांवर उभारण्यात येणाऱ्या मंडप/स्टेज/कमान/रनिंग मांडव इत्यादींना या नविन मान्य धोरणाअंतर्गत यापुढे परवानग्या देण्यात येतील. शहरामध्ये सार्वजनिक सण/उत्सव साजरे करणाऱ्या सर्व संबंधितांनी या नविन धोरणानुसार आवश्यक त्या परवानग्या घेवून मान्य अटी/शर्ती व तरतुदींचे काटेकोरपणे पालन केल्यास उत्सवांचे कालावधीत नागरिकांचे रहदारीस व वाहतूकीस अडथळे निर्माण होणार नाहीत, तसेच जनभावनांचा मान राखून जनजीवन विस्कळीत न होता वर्षभरातील सर्व धर्मीयांचे सण/उत्सव योग्यरित्या साजरे होतील.

# मंडप/स्टेज परवाना कार्यपद्धती व त्याबाबतच्या अटी व शर्ती

- अर्ज सादर करण्याची पद्धती :-

सण/उत्सवाच्या कमीत कमी ५ दिवस अगोदर संबंधितांनी त्यांना उत्सवाकरिता ज्या ठिकाणावर तात्पुरता मंडप/स्टेज/कमान उभारावावयाचे आहे, त्या भागाचे पुणे महानगरपालिकेच्या संबंधित क्षेत्रिय कार्यालयाकडे आवश्यक ती कागदपत्रे , नकाशे व मा. पोलीस आयुक्त यांनी प्राधिकृत केलेले संबंधित पोलीस स्टेशनचे पोलीस निरिक्षक व वाहतूक पोलीस यांची पुर्व परवानगी बाबतचा ङङ्गङङ्गना हरकत दाखला " समाविष्ट करुन अर्ज सादर करावा. पुणे महानगरपालिकेच्या संबंधित महापालिका सहाय्यक आयुक्त हे या धोरणाअंतर्गत सदर अर्जामधील आवश्यक त्या कागदपत्रांची शहनिशा/पुर्तता करुन त्याबाबत खाली नमूद केलेल्या बाबी तपासून सदर अर्जातील मागणीनुसार महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम-१९४९ चे कलम २३४ अन्वये तात्पुरता मंडप/स्टेज/कमान तसेच धावता मंडप उभारणेस परवानगी देतील.

१. अर्जासोबत जोडावयाची आवश्यक ती कागदपत्रे :- अ) पूर्वीचे परवानाधारक- अर्जदार मंडळाचे पदाधिकारी, मंडप/स्टेज/कमानीचे ठिकाण व लांबी-रुंदी-उंचीची मापे याबाबी मागील वर्षाचे परवान्याप्रमाणेच असल्यास अशा अर्जदारांनी मागील वर्षी मांडव/स्टेज/कमान करिता घेण्यात आलेल्या अधिकृत परवानग्याबाबतची सर्व कागदपत्रांच्या झेरॉक्स प्रती व वाहतूक पोलीस शाखेकडील सक्षम अधिकाऱ्यांनी दिलेल्या ना-हरकत पत्र जोडावे.

ब) नविन अथवा काही बदल झालेले परवानाधारक- १) मंडप टाकण्यात येणाऱ्या जागेचा मंडपाचे लांबी, रुंदी व उंची तसेच लगतच्या रस्त्याचे रुंदीचे मोजमापासह कधा नकाशा. २) वाहतूक पोलीस शाखेकडील सक्षम अधिकाऱ्यांनी दिलेल्या ना-हरकत पत्र जोडावे.

क) संबंधित संस्था/संघटना/मंडळे यांचे सध्या कार्यरत असलेले अध्यक्ष, उपाध्यक्ष, सचिव व अर्जदार तसेच वैयक्तिक अर्जदार असल्यास त्यांचे स्वतःचे छायाचित्रासह संपूर्ण नाव व पत्ता, संपर्क नंबर व स्वाक्षरीसह आवश्यक ती माहिती.

२. परवानगी देण्यापूर्वी संबंधित अर्जदारांनी अर्जासोबत सक्षम पोलीस अधिकाऱ्याकडे/स्थानिक पोलीस स्टेशनची तसेच वाहतूक पोलीस शाखेकडील सक्षम अधिकाऱ्यांनी तात्पुरता मंडप/स्टेज उभारणेस परवानगी देणेकामी दिलेली ना-हरकत प्रमाणपत्रे, तसेच उभारावयाच्या तात्पुरता मंडप/स्टेज बाबतचा लांबी, रुंदी व उंची सह कधा नकाशा इ. कागदपत्रे जोडली असल्याची खात्री करावी.

३. मंडपाची उंची ४० फूटापेक्षा जास्त नसावी. जर संबंधित अर्जदारांना ४० फूटापेक्षा उंचीचा मंडप उभारावयाचा असल्यास त्याकामी संबंधितांनी सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातून अधिकृत स्थापत्य अभियंता यांचेकडील स्ट्रक्चरल स्टॅबीलीटी सर्टिफिकेट अर्जासोबत जोडणे आवश्यक राहील.

४. तात्पुरता मंडप/स्टेज उभारताना मनपा पदपथावर खड्डे घेतले जाणार नाहीत. जर संबंधितांकडून याकामी सार्वजनिक ठिकाणी खड्डे घेतल्याचे किंवा इतर सार्वजनिक मालमत्तेचे काही नुकसान केल्याचे प्रशासनास आढळून आल्यास त्यापोटी संबंधितांकडून प्रति खड्डा रुपये २०००/- प्रमाणे दंड आकारणी करुन त्याची वसूली केली जाईल. तसेच संबंधितांवर आवश्यक ती कायदेशीर पुढील कार्यवाही करण्यात येईल. क्राँक्रीट रोडवर कोणतेही खड्डे करण्यात येऊ नयेत अशा रस्त्यावर खड्डे घेतल्यास प्रथम वर्षी प्रती खड्डा रुपये २०००/- प्रमाणे दंड आकारुन वसूली करण्यात येईल. पुढील

वर्षी पुन्हा खड्डे घेतल्याचे आढळल्यास दंड वसूली करुन कायदेशीर गुन्हा नोंदविण्याची कार्यवाही करण्यात येईल.

५. मंडप/स्टेज उभारणारांनी आवश्यकतेनुसार उत्सवादरम्यान तेथे पाणी व वीज वापरावयाचे असल्यास त्याचे संबंधित विभागाकडून तात्पुरते अधिकृत स्वतंत्र कनेक्शन घेणे आवश्यक राहील. पुणे महानगरपालिकेच्या रस्त्यावरिल विुत पोलवरुन अनाधिकृतपणे वीज जोडणी घेतल्याचे आढळून आल्यास संबंधितांवर स्थानिक पोलीस स्टेशन येथे गुन्हा नोंदवून कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

६. संबंधितांना उत्सवाचे मंडप/स्टेजवर अथवा रनिंग मंडपाचे झालरींवर संबंधित मंडळांचे सौजन्याने इतर उत्पादकांच्या माल/वस्तुंची अनधिकृतपणे जाहिराती लावता येणार नाहीत. याकरिता पुणे महानगरपालिकेकडून अधिकृत परवानगी घेवून मंडपाचे ५० मी. अंतरापर्यंतचे भागात स्थानिक पोलीस व वाहतूक विभाग यांचे यांचे ना हरकत पत्रानुसार रनिंग मंडप टाकून जाहिराती लावणेस पुणे महानगरपालिकेकडे जाहिराती पोटी रुपये ५००/- परवाना फी भरुन घेता येईल. तथापि अशा परवानगीने लावण्यात येणाऱ्या सर्व जाहिरातीमधील एक पंचअंश (१/५) भागामध्ये महापालिकेचे उपक्रमाची जाहीरात लावणे बंधनकारक राहील. परंतु एकापेक्षा जास्त मंडळे वरिल ५० मीटरच्या अंतरामध्ये येत असल्यास सदरचे अंतर सर्वांना समप्रमाणात विभागून देऊन त्यानुसार जाहिराती लावण्याची परवानगी देण्यात येईल. परंतु कोणत्याही मंडळास त्यांचे मंडपापासून ५० मी. पेक्षा जास्तीच्या अंतरात रनिंग मंडप टाकून जाहिराती लावता येणार नाहीत. लावण्यात येणाऱ्या जाहिरातींबाबत काही तक्रारी आल्यास त्याबाबतची संपूर्ण जबाबदारी संबंधित मंडळाची राहील.

७. संबंधित अर्जदार यांनी उत्सवाचे ठिकाणी स्पिकरचा आवाज व इतर वा ांचे आवाजाबाबत संबंधित शासकीय कार्यालयांकडून ठरवून दिलेल्या पातळीपेक्षा जास्त आवाज केला जाणार नाही, याबाबतचे बंधन राहील. याबाबत पोलीस विभागाकडून ठरवून देण्यात आलेल्या नियमांचे पालन करावे लागेल.

८. अर्जदार यांना ज्या कार्यक्रमाकरिता मंडप/स्टेज उभारण्यास परवानगी देण्यात आली आहे, त्या व्यतिरिक्त इतर कोणत्याही स्वरुपाचे कार्यक्रम सदर ठिकाणी करता येणार नसल्याचे बंधनकारक राहील.

९. मंडप परवान्याची मुदत संपल्यानंतर संबंधितांनी ३ दिवसांचे आत स्वखर्चाने सदरचा मंडप, रस्त्यावरील देखावे, विटांमधील बांधकामे, देखाव्यातील मुर्ती व अन्य साहित्य रस्त्यांवरुन ताबडतोब हटवून घेवून उभारण्यात आलेला मंडप/स्टेज अथवा इतर तात्पुरते बांधकाम हे मुदतीनंतर तातडीने स्वतःचे जबाबदारीवर काढून टाकणे बंधनकारक राहील.

१०. मंडप/स्टेज करिताचा कालावधी संपल्यानंतर संबंधितांनी त्वरित सदरच्या जागेचे कोणतेही नुकसान झालेले नाही अशा अवस्थेत तेथील संपूर्ण भागाची साफसफाई करुन सदरची जागा संपर्णू मोकळीक केले बाबत महानगरपालिकेस कळविणे आवश्यक आहे.

११. मंडप/स्टेज परवान्याकरिता महानगरपालिकेकडे भरण्यात आलेली परवाना फी कोणत्याही कारणास्तव परत दिली जाणार नाही. तसेच परवानगीची मुदत संपल्यानंतर नव्याने सदर मंडप/स्टेजकरिता वाढीव कालावधीकरिताची पुन्हा परवानगी दिली जाणार नाही.

१२. सण/उत्सव कालावधीत मंडप/स्टेज/कमान अथवा रनिंग मांडव इत्यादीकरिता परवानगी दिल्यानंतर संबंधितांकडून त्याचे आकारमानानुसार प्रचलित ठरवून दिलेल्या मान्य दरानुसार परवाना फी ची आकारणी करुन वसूली करण्यात येईल.

१३. संबंधित अर्जदारांना उत्सव साजरा करणेकरिता आवश्यक असणाऱ्या संबंधित इतर शासकीय विभागांच्या परवानग्या घेणे बंधनकारक राहील.

१४. महाराष्ट्र शासनाकडून वेळोवेळी अशा परवानग्यांबाबत पारित केलेले शासन निर्णय, पुणे महानगरपालिकेकडून वेळोवेळी आवश्यकतेनुसार ठरविण्यात आलेले नियम अथवा अटी, शर्ती तसेच मा. उध न्यायालय/मा. सर्वोध न्यायालय यांचेकडून वेळोवेळी दिलेले निर्देश इत्यादींचे पालन संबंधित परवानाधारकांनी करणे बंधनकारक राहील.

१५. संबंधितांना दिलेल्या परवानगीची कागदपत्रांच्या झेरॉक्स प्रती सदर मंडप/स्टेजचे दर्शनी भागात सर्वांना दिसून येतील अशा सुरक्षित ठिकाणी लावणे बंधनकारक राहील.

१६. वरिल नमूद केलेल्या अटी, शर्तींचे संबंधितांकडून पालन न केले गेल्यास व तसे निदर्शनास आल्यास संबंधितांना दिलेली परवानगी रद्द करण्यात येवून त्यांचा मंडप/स्टेज काढून टाकणेबाबतची कार्यवाही करण्यात येईल.

१७. महानगरपालिकेकडून सण उत्सवाकरिता मंडप/स्टेज/कमानीबाबत देण्यात आलेले अधिकृत परवाने कोणत्याही कारणास्तव २४ तासाची पूर्व सूचना देऊन रद्द करणेबाबतचा ह महानगरपालिकेस राहील.

१८. संबंधित मंडप/स्टेज/कमान/रनिंग मंडप परवानाधारकांना परवानगी देतेवेळी ठरवून दिलेल्या पुणे महानगरपालिकेकडील अटी, शर्तींचे तसेच स्थानिक पोलिस स्टेशन / वाहतूक पोलीस विभाग यांचेकडून ना-हरकत पत्रामध्ये नमूद केलेल्या सर्व अटी-शर्तींचे पालन करणे बंधनकारक राहील.

१९. अधिकृत कमानींवर महानगरपालिकेकडील आकाशचिन्ह परवाना विभागाची परवानगी घेऊनच जाहिराती लावणे आवश्यक आहे. विनापरवाना व आक्षेपार्ह/अडथळा निर्माण करणाऱ्या कमानी उभारल्यास अथवा अनाधिकृतपणे जाहिराती लावल्यास संबंधित जाहिरातीत दर्शविलेल्या उत्पादक कंपनीवर व संबंधितांवर कायदेशीर कारवाई केली जाईल.

२०. सार्वजनिक सण/उत्सव साजरा करित असताना संबंधित संस्था/संघटना/मंडळे अथवा वैयक्तिक नागरिक यांनी पर्यावरणपुरक उपक्रमांना योगदान देवून याकामी महाराष्ट्र शासनाच्या पर्यावरण विभागाकडील प्रदुषण नियंत्रण विषयक कायाची/मार्गदर्शक सूचनांची अंमलबजावणी करणे आवश्यक राहील.

२१. अधिकृत मंडप/स्टेज/कमान/रनिंग मंडप उभारताना संबंधितांनी सुरक्षिततेच्या व वाहतूकीचे दृष्टीकोनातून घ्यावयाच्या दक्षतेबाबत महानगरपालिकेकडून घेण्यात येणारे ङङ्गङङ्गहमीपत्र " संबंधित परवानाधारक यांना लिहून देणे बंधनकारक राहील.

- **ध्वनी प्रदूषण नियंत्रणाबाबत :-**

सार्वजनिक ठिकाणी वातावरणात दिवसेंदिवस ध्वनीची तीव्रता औौगिक कामे, विविध प्रकारची बांधकामे, जनित्रे (जनरेटर्स), ध्वनिवर्धक (लाऊड स्पीकर्स), सार्वजनिक सभा, संगीत वो, वाहनांचे भोंगे व इतर यांत्रिक साधनांमुळे ध्वनीचे प्रमाण वाढतच आहे. ध्वनी

प्रदूषणामुळे नागरिकांच्या आरोग्यावर व मानसिक स्वास्थ्यावर अनिष्ट परिणाम होत असल्यामुळे तसेच वातावरणातील ध्वनीची योग्य पातळी राखण्याच्या हेतूने ध्वनी निर्माण करणाऱ्या स्त्रोतांचे नियमन व नियंत्रण करणे आवश्यक असल्याने महाराष्ट्र शासनाने शासन निर्णय दि. २१ एप्रिल २००९ अन्वये ध्वनी प्रदूषण (नियंत्रण व नियमन) नियम २००० ची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यासाठी प्राधिकरणाची नियुक्ती करण्यात आलेली आहे. याबाबत नियंत्रण व कायदेशीर बाबींची अंमलबजावणी पुणे शहर पोलीस विभागाकडून काटेकोरपणे करण्यात येईल. त्याअनुषंगाने संबंधितांनी ध्वनी प्रदूषणाबाबत शासनाने ठरवून दिलेल्या नियमांचे पालन करणे बंधनकारक राहील.

ध्वनी प्रदूषणाबाबत नागरिकांकडून येणाऱ्या तक्रारींच्या नोंदी ठेवणेकरीता संबंधित पोलीस स्टेशनमध्ये स्वतंत्र रजिस्टर ठेवण्यात येईल. प्राप्त झालेली ध्वनी प्रदूषणाच्या तक्रारीबाबत संबंधित पोलीस स्टेशनकडून नियमानुसार आवश्यकती कार्यवाही करण्यात येईल.

- **शांतता क्षेत्र जाहीर करणे :-**

पुणे महानगरपालिकेच्या समन्वयाने पुणे पोलीस आयुक्त कार्यालय, पुणे यांचेमार्फत पुणे शहरातील शांतता क्षेत्र ठरवून जाहीर करण्यात येतील.

- **तक्रार निवारण व्यवस्था :-**

१. मा. उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार पुणे महानगरपालिकेने सार्वजनिक उत्सवाच्यावेळी अनाधिकृतरित्या उभारलेल्या मंडपांबाबत तसेच ध्वनी प्रदूषणाबाबत, नागरिकांच्या तक्रारी स्वीकारण्यासाठी पुणे पोलीस विभाग व पुणे महानगरपालिका यांचे समन्वयाने शहरातील नागरिकांकरिता आपत्कालिन विभाग व टोल फ्री नंबर, ई-मेल सुविधा उपलब्ध करण्यात येवून त्यास दोन्ही विभागाकडून उचित प्रसिध्दी देण्यात येईल.

२. वरील मुांमध्ये नमूद केल्याप्रमाणे व्यवस्था उपलब्ध केल्यानंतर त्याबाबतची माहिती आपत्कालिन विभागाला देण्यात येवून तसे सर्व महापालिका सहाय्यक आयुक्त, सर्व उप आयुक्त, अतिरिक्त आयुक्त १, २ व ३ यांना तसेच संबंधित शासकीय यंत्रणांना उचित कार्यवाहीसाठी अग्रेषीत करण्यात येईल.

वरिल अटी, शर्तीनुसार पुणे शहरातील सण, उत्सवाचे कालावधीत नागरिकांना सार्वजनिक उत्सवाकरिता मंडप/स्टेज/कमान/रनिंग मंडप इत्यादींना प्रचलित मान्य दराने परवाना फी ची आकारणी करुन परवानग्या देण्यात येतील.

✪✪✪✪✪